# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/१०/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## पोस्टे काटोल हद्दीतील डोंगरगाव येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दिनांक १७/१०/२०२४ रोजी पोस्टे काटोल येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, डोंगरगाव गावात पारधी बेडयामध्ये राहणारा रामू राजपूत नावाचा इसम हा त्याचे घरासमोर मोहाफुल गावठी दारूची भट्टी लावुन दारू काढत आहे. तसेच मोहाफुल गावठी दारूची विक्री करीत आहे. अशा खबरेवरून स्टाफचे मदतीने रेड कारवाई करून आरोपीचे घरासमोर पाहणी केली असता त्याचे घराचे अंगणात १) ०५ ड्रम मध्ये १००० लिटर मोहाफुल रसायण सडवा प्रति ड्रम मध्ये २०० लिटर मोहाफुल सडवा प्रती लिटर ३५ रू प्रमाणे कि. ३५,००० रू २) एका प्लॉस्टिक डबकी मध्ये २० लिटर मोहाफुल गावठी दारू प्रति लिटर १०० रू प्रमाणे कि. २०००रू ३) व ०५ ड्रम प्रति ५०० रू प्रमाणे कि एकुण २५०० रू असा एकुण ३९,५०० रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूद्ध कलम ६५ (ई) (एफ) मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापु रोहोम यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील पोनि निशांत मेश्राम, सपोनि अविनाश मेश्राम, पोउपनि कंगाले, पोहवा पवन वाघमारे, पोना भुषण मदनकर, पोअं. संतोष बाट यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर